# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

# Date 17 October 2026

# Time 11.00 to 11.05 AM

# Language Marathi

## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

## **प्रादेशिक बातम्या**

## **दिनांक १७ ऑक्टोबर २०२६ सकाळी ११.०० वाजता**

****

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत आणि चीनला दिलासा देत रशियाकडून तेल आणि गॅस खरेदी करणाऱ्या देशांवर लावण्यात येणारे अतिरिक्त शुल्क आणि निर्बंधांमध्ये सूट दिली आहे. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प म्हणाले की, हा निर्णय अमेरिकेच्या राष्ट्रीय हिताचा विचार करून घेण्यात आला आहे. अतिरिक्त शुल्क लावण्याच्या निर्णयावर त्यांनी १८ सप्टेंबर रोजी स्वाक्षरी केली होती. या कायद्यानुसार रशियाकडून तेल आणि गॅस खरेदी करणाऱ्या प्रमुख देशांवर १०० टक्क्यांपर्यंत अतिरिक्त शुल्क लावण्याची तरतूद होती. याशिवाय, रशियातून आयात होणाऱ्या वस्तूंवर ५०० टक्क्यांपर्यंत शुल्क लागू शकत होते. मात्र, ट्रम्प यांनी सध्या काही शुल्क लागू करण्यापासून सूट दिली आहे. दरम्यान, अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ यांचा भारत दौरा देखील प्रस्तावित आहे. ते २० ऑक्टोबर रोजी मुंबईत परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांची भेट घेऊ शकतात. त्यानंतर ते गुजरातमधील जामनगर रिफायनरी परिसराला भेट देण्याचीही शक्यता आहे. हा निर्णय अशावेळी आला आहे, जेव्हा रशिया आणि अमेरिका यांच्यात डिझेल पुरवठ्याबाबत कराराची शक्यता आहे. तर, नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या अमेरिकेतील मध्यावधी निवडणुकांपूर्वी अमेरिकेत डिझेलच्या किमती वाढत आहेत.

****

औषधनिर्मिती क्षेत्रातील संशोधन आणि नावीन्यासाठी राज्यात अनुकूल वातावरण असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. ॲस्ट्राझेनेका फार्मा इंडिया लिमिटेडच्या नवीन मुख्यालयाचं उदघाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते काल मुंबई इथं करण्यात आलं; त्यावेळी ते बोलत होते. देशात बल्क ड्रग पार्क विकसित

करण्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा प्रयत्न महत्त्वपूर्ण असून, हे पार्क कार्यान्वित झाल्यानंतर औषधनिर्मिती क्षेत्रात मोठे परिवर्तन घडेल, असं मुख्यमंत्री म्हणाले.

****

महाराष्ट्र शासनाने खरीप हंगाम २०२६ मधील परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील ३०४ तालुके दुष्काळग्रस्त म्हणून घोषित केले आहेत. या तालुक्यांतील शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कमाफी देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मुंबई विद्यापीठाने संलग्न तसंच स्वायत्त महाविद्यालयांना दुष्काळग्रस्त तालुक्यांतील पात्र विद्यार्थ्यांनी यापूर्वी भरलेल्या परीक्षा शुल्काची संपूर्ण रक्कम तातडीने परत करण्याचे निर्देशही दिले आहेत.

****

राज्यस्तरीय रग्बी अजिंक्यपद स्पर्धेसाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या १४ वर्षांखालील मुलांचा, मुलींचा आणि वरिष्ठ महिलांचा संघ काल जाहीर करण्यात आला. मुंबईत आजपासून दोन दिवस या स्पर्धा होणार आहेत.

****

जालना जिल्ह्यातील 'महिको रिसर्च फाऊंडेशन ट्रस्ट'च्या नेत्रालयाला लागून असलेल्या ३ हेक्टर शासकीय जमिनीवर आता डोळ्यांच्या उपचारांसोबत इतर अनेक गंभीर आजारांचे उपचार आणि वैद्यकीय शिक्षण उपलब्ध होणार आहे. मूळ नेत्रालयाच्या सेवेला कोणताही धक्का न लावता, या जागेवर अत्याधुनिक वैद्यकीय तसंच शैक्षणिक सुविधा अत्यंत माफक आणि परवडणाऱ्या दरात सुरू करण्यास राज्य सरकारने विशेष अटींवर परवानगी दिली आहे. या जागेचा आणि सुविधांचा वापर निव्वळ सार्वजनिक हितासाठी आणि ना नफा ना तोटा तत्त्वावरच करण्यात येणार आहे. रुग्णांना आणि सर्वसामान्यांना सवलतीच्या तसंच अत्यंत परवडणाऱ्या दरात औषधं, गोळ्या, इंजेक्शन्स आणि वैद्यकीय साहित्य मिळावं यासाठी शासनाच्या योजनेनुसार 'जनऔषधी केंद्र' किंवा ना नफा ना तोटा तत्त्वावरील औषध विक्री केंद्र सुरू करण्याची मुभादेखील देण्यात आली आहे.

****

नाशिक जिल्ह्यातल्या मालेगाव तालुक्यातील एका गावात झालेल्या सव्वाचार वर्षांच्या बालिकेच्या अत्याचार आणि हत्या प्रकरणातील आरोपी शेखर ऊर्फ विजय संजय खैरनार याला मालेगाव जलदगती न्यायालयाचे न्यायाधीश कृ. ग. पालदेवार यांनी काल फाशीची शिक्षा सुनावली आहे. याशिवाय पीडितेच्या कुटुंबीयांना राज्य

शासनाच्या मनोधैर्य योजनेअंतर्गत १० लाख रूपयांची भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत. जलदगती न्यायालयात या खटल्याची सुनावणी होऊन अवघ्या ११ महिन्यांत न्यायालयाने हा निकाल दिला. १६ नोव्हेंबर २०२५ रोजी चार वर्षांच्या या बालिकेवर अत्याचाराची ही घटना घडली होती.

****

बुलडाणा जिल्ह्यातील खामगाव इथे पाणी वाचवण्यासाठी जनजागृती करिता वर्ल्ड फॉर नेचर, तरुणाई फाउंडेशन आणि लायन्स क्लब खामगाव संस्कृती या संघटनांनी चित्रांच्या माध्यमातून पाणी वाचवा जीवन वाचवा ही  मोहीम हाती घेतली आहे. राज्यात प्रथमच रस्त्यावर अशाप्रकारे चित्रांच्या माध्यमातून अशी मोहीम राबवण्यात येत आहे. खामगावचे प्रसिद्ध कलाअध्यापक संजय गुरव यांनी या मोहीमेसाठी मोठं सहकार्य केलं असून सामाजिक कार्यकर्ते राजू कोल्हे, गणेश कोकाटे, संतोष डवले, सुभाष बोचरे आणि तरुणाई फाउंडेशनचे असंख्य स्वयंसेवक दिवसरात्र रस्त्यावर उभे राहून ही जनजागृती करत आहेत.

****